# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## परिपत्रक

युजीसी रेग्युलेशन २००९ क्र.F-१-१/२००२/(PS)Exemp. दि.१ जून, २००९ मध्ये पीएच.डी. पदवी प्रदान करताना विद्यापीठांना काही निकष आखून दिलेले आहेत.

केंद्रशासन मनुष्यबळ विकास मंत्रालय राजपत्र दि.११ जुलै, २००९ नुसार असिस्टंट प्रोफेसर (पूर्वीचे अधिव्याख्याता) पदासाठी नेट/सेट ही पात्रता अनिवार्य करण्यात आली असून, फक्त ज्या उमेदवारांनी पीएच.डी. पदवी युजीसी **(Minimum Standard & Procedure for award of M.Phil./Ph.D. Degree)** रेग्युलेशन २००९ नुसार संपादन केली असेल त्यांनाच नेट/सेट मधून सूट देण्यात आली आहे.

या संदर्भात विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सर्व संबधितांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, दि.११ जुलै,२००९ पूर्वी संपादन किंवा पीएच.डी साठी नोंदणी केलेली विद्यापीठाची पीएच.डी. पदवी ही युजीसी **(Minimum Standard & Procedure for award of M.Phil./Ph.D. Degree)** रेग्युलेशन २००९ नुसार केलेल्या पीएच.डी. पदवीशी समकक्ष धरुन, नेट/सेट मधून सूट मिळण्यासाठी ग्राहय धरण्यात यावी व त्याची अंमलबजावणी दि.११ जुलै, २००९ नंतरच्या शिक्षक निवडीच्या प्रक्रियेमध्ये करण्यात यावी. या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोग व महाराष्ट्र शासन यांचेकडून शैक्षणिक अर्हतेसंदर्भात वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश निवड झालेल्या उमेदवारावर बंधनकारक राहतील. या आशयाचा उल्लेख नियुक्ती आदेशामध्ये करुन संबंधित उमेदवाराकडून अशा आशयाचे बंधपत्र (Undertaking) घेण्यात यावे.

सदर परिपत्रकातील तरतूद ही सर्व संबंधित अकृषि विद्यापीठे व संलग्नीत महाविद्यालयांनी ग्राहय धरावी.

सदर परिपत्रक शिवाजी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

Sd/-

संचालकांकरिता<br>महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

संलग्नता/टे.१/एमएके/२२७<br>दिनांक :- ३१/०३/२०१०

प्रति माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी
१) प्राचार्य/संचालक, सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्था
२) विभाग प्रमुख,अधिविभाग,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
३) प्रशासकीय विभागप्रमुख,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

प्रत
१) मा.कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे
२) शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे
३) सर्व अकृषी विद्यापीठांचे संचालक, विद्यापीठ महाविद्यालय विकास मंडळ
४) व्यवस्थापन परिषद/अधिसभा/विद्यापरिषद सदस्य
५) अधिष्ठाता सर्व विद्याशाखा

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com